महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०१७

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

सोलापूर जिल्ह्यातील फिरती बस शाळा बंद असल्याबाबत

(१) ३९७३१ (२५-०५-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील व जिल्ह्यातील वंचित मुलांच्या व ऊसतोड कामगारांच्या मुलांपर्यंत वस्तीत जाऊन शिक्षणाचे धडे देणारी राज्यातील पहिली फिरती बस शाळा गत वर्षी दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी सुरु केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वंचित घटकातील बालकामगारांच्या घरांपर्यंत जाऊन शिक्षणाचे धडे देणारी ही फिरती बस शाळा निधीअभावी नुकतीच बंद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने ही फिरती शाळा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२३-०६-२०१७) :(१) हे खरे नाही.

राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प, सोलापूर व सोलापूर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने ०६ महिन्यांच्या प्रायोगिक तत्वावर फिरती बस शाळा हा उपक्रम दि.०९.०१.२०१५ रोजी सुरु करण्यात आला होता.

(२) हे खरे नाही.

सदर उपक्रम तात्पुरत्या स्वरुपात प्रायोगिक तत्वावर ०६ महिन्यांच्या कालावधीसाठी सुरु करण्यात आला होता.

(३) सदर उपक्रम ०६ महिन्यांच्या प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात आला असल्याने, कालावधी संपल्यावर सद्यस्थितीत हा उपक्रम स्थगित/बंद आहे.

(४) लागू नाही.

कळवा (जि.ठाणे) येथील मफतलाल कंपनीच्या कामगारांची देणी शिल्लक असल्याबाबत

(२) ५४७९२ (२९-०८-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवा (जि.ठाणे) येथील मफतलाल कंपनीची जमीन करारभंग झाल्यामुळे सरकारजमा करण्याचा जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश मा. उच्च न्यायालयाने फेटाळून लावल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीतील कामगारांची देणी देण्याचे देखील शिल्लक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामगारांची देणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२३-०६-२०१७) :(१) हे अंशत: खरे आहे.

मफतलाला इंजिनिअरीग इंडस्ट्रिज लि. या कंपनीस मौजे कळवा ता.जि.ठाणे येथील कब्जाहक्काने व भूसंपदान करुन दिलेल्या जमिनी शासनाची पूर्वपरवानगी न घेता बँकेकडे गहाण ठेवून मोठ्या प्रमाणात कर्ज उभारणी केल्याने उपविभागीय अधिकारी, ठाणे विभाग, ठाणे यांनी त्यांचेकडील आदेश क्र.टिडी/टे-२/जमिनबाब/शर्तभंग/एसआर-०७/१५ दिनांक २१/०८/२०१५ अन्वये शासन जमा करण्याचे आदेश पारित केले होते. त्याविरुध्द मा.उच्च न्यायालयाचे दिनांक १६/१०/२०१५ रोजीचे आदेशानुसार मुळ अधिकार अभिलेखात कंपनीचे नाव दाखल करण्यात आले आहे. तसेच त्याबाबत जैसे थे परिस्थिती ठेवण्याचे मा.उच्च न्यायालयाने सदर आदेशात नमुद केले आहे. मौजे कळवा ता.जि.ठाणे येथील मफतलाल कंपनीस दिलेल्या भोगवटादार वर्ग-२ च्या जमिनीबाबज मा.उच्च न्यायालयात भारतीय कंपनी कायदा १९५६ चे कलम ४४६ (१) अंतर्गत कंपनी ॲप्लीकेशन (लॉजींग) नं. ८६५/२०१५ दाखल करण्यात करण्यात आले होते. सदरचा दावा मा.उच्च न्यायालयाने दिनांक १२/०४/२०१६ रोजीचे आदेशान्वये तांत्रिक मुद्यांवर फेटाळला असून भारतीय कंपनी कायदा १९५६ चे कलम ४४६ (२) अन्वये सदर जमिनीबाबत पुन:श्च न्यायालयात अर्ज करणेची परवानगी/स्वतंत्र देणेंत आले आहे. त्या अनुषंगाने भारतीय कंपनी कायदा १९५६ चे कल ४४६ (२) अन्वये सदर जमिनीबाबत मा.उच्च न्यायालय मुंबई येथे उपविभागीय अधिकारी ठाणे यांनी कंपनी ॲप्लीकेशन (लॉज) नं. ६०६/२०१६ दाखल केला असून दाव्यातील प्रतिवादी क्रमांक १०-अ यांच्यामार्फत दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रास अनुसरुन उपविभागीय अधिकारी, ठाणे यांनी दिनांक ७/२/२०१७ रोजी मा.उच्च न्यायालयात प्रत्युत्तर प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

तसेच कंपनी याचिका क्रमांक ७४३/८९ मधील कंपनीअर्ज (लॉजींग) क्रमांक ५३६/२०१६ प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ८/३/२०१७ रोजीच्या आदेशानुसार मौजे कळवा, ता.जि.ठाणे येथील मफतलाल इंजिनिअरींग इंडस्ट्रज लि., या कंपनीला भूसंपादन करुन दिलेल्या जमिनीपैकी ३३-२३-८ हे. आर.जमिनीची विक्री करण्यास अटी व शर्तीच्या अधिन

राहून महसूल विभागाने शासन ज्ञापन दिनांक २२/४/२०१७ अन्वये मान्यता देवून तसेच सदर कंपनीस शासनामार्फत प्रदान करण्यात आलेल्या ४-६१-५ हे.आर. जमिनीच्या अनुषंगाने दिनांक २१/११/१९५७ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी ठाणे यांना महसूल विभागाच्या शासन पत्र दिनांक २१/४/२०१७ अन्वये कळविण्यात आले आहे.

(२) होय.

सदरहू कंपनीची मालमत्ता सन १९९९ पासून अवसायक कोर्ट रिसिव्हर, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे ताब्यात असुन अवसायक यांच्याकडे उक्त कंपनीच्या प्राप्त झालेल्या ३०३३ कामगारांच्या दाव्यापैकी २८३२ कामगारांचे रु.१,४८,५७,३३,०१४/- इतक्या रक्कमेचे दावे अवसायक यांनी दाखल करुन घेतले आहेत.

(३) सदरहू आस्थापना अवसायनात गेली आहे परिणामी कामगारांची देणी देण्याबाबतची बाब अवसायकांच्या अखत्यारीत असून प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने कामगारांची देणी देण्याबाबत शासनाने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापुर जिल्हयात बांधकाम क्षेत्रात मोठया प्रमाणात बालमजूर कार्यरत असल्याबाबत

(३) ५७०३४ (२४-०८-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापुर जिल्हयात बांधकाम क्षेत्रात मोठया प्रमाणात बालमजुर कार्यरत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर बालमजुरांना मजुरीपासून मुक्त करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२२-०६-२०१७) :(१) हे खरे नाही.

कोल्हापूर येथील सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयाकडून वेळोवेळी आयोजित करण्यात आलेल्या धाडसत्रांमध्ये बांधकाम क्षेत्रात काम करणारे बालमजुर आढळून आले नाहीत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक शहरात सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याबाबत

(४) ५७९५३ (२६-०८-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंहस्थ कुंभमेळ्यानंतर नाशिक शहरात सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याची गरज प्रकर्षाने जाणवलेली असुन सुध्दा सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यात न आल्याने गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना याचा फायदा होऊन शहरात गुन्हेगारीमध्ये वाढ झाल्याचे माहे जून, २०१६ वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत, तसेच शहरात तातडीने सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०६-२०१७) :(१) व (२) नाशिक शहरात सिंहस्थ कुंभमेळ्यानंतर कायमस्वरुपी सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यासाठी शासन नियुक्त तांत्रिक सल्लागार मे.पीडब्ल्युसी कंपनीची नियुकती करण्यात आली असुन सदर कंपनीच्या सहाय्याने पोलीस आयुक्त, नाशिक यांनी सर्वेक्षण करुन नाशिक शहरात ३०२ ठिकाणी ९२८ कॅमेरे बसविणे बाबत तपशिलवार प्रकल्प अहवाल शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावास उच्चस्तरीय समितीने माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या मान्यतेच्या अधिन प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या मान्यतेबाबतच कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

बुलढाणा जिल्ह्यातील बाल कामगारांचा पूनर्वसन प्रकल्प रखडल्याबाबत

(५) ५९८५८ (२९-०८-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात दिनांक १८ फेब्रवारी २०१२ ते ०३ मार्च २०१३ या कालावधीत केलेल्या सर्वेक्षणात विविध ठिकाणी १७५८ बाल कामगार आढळून आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बालकामगारांच्या पूनर्वसन आणि मार्गदर्शन शाळेचा प्रस्ताव जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्याकडून शासनास प्राप्त होऊन देखील शासनाने अद्यापपर्यंत त्यास मान्यता प्रदान केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२३-०६-२०१७) :(१) हे अंशत: खरे आहे.
बुलढाणा जिल्ह्यात दिनांक १८/०२/२०१२ ते ०३/०३/२०१२ या कालावधीत केलेल्या सर्वेक्षणात विविध ठिकाणी १७५८ बाल कामगार आढळून आले आहेत.
(२) बुलढाणा जिल्ह्यात ३२ पूनर्वसन आणि मार्गदर्शन शाळा सुरु करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, बुलएाणा यांनी दिनांक ०५/०९/२०१३ व दिनांक २८/०७/२०१५ च्या पत्रान्वये केंद्र शासनास पाठविला आहे.
(३) केंद्र शासनाकडून या संदर्भात आदेश प्रलंबित आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई शहरात सायबर गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी पोलीस निरीक्षकांची व अधिकाऱ्यांची संख्या वाढविण्याबाबत

(६) ५९९३८ (२३-०८-२०१६). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरात तंत्रज्ञानाचा वापर करुन केल्या जाणाऱ्या सायबर गुन्ह्यांची संख्या वाढत असताना अश्या गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी केवळ दोनच पोलीस निरीक्षक उपलब्ध असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे मार्च, २०१६ पर्यत माहिती व तंत्रज्ञान कायद्याअंतर्गत अद्यापपर्यंत ८० गुन्हे नोंदविण्यात आले असून या गुन्ह्यांचे तपास अधिकारी म्हणून एका निरीक्षकाला ४० गुन्ह्यांवर लक्ष ठेवावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सायबर गुन्ह्यांचा तपास वेगाने व्हावा याकरीता पोलीस निरीक्षकांची व अधिकाऱ्यांची संख्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०६-२०१७) :(१) पोलीस आयुक्त, बृहनमुंबई अंतर्गत सायबर पोलीस ठाण्याची एप्रिल, २०१६ ची पोलीस निरीक्षकांची मंजूर संख्या -४ असून, कार्यरत पद-१ व प्रतिनियुक्तीवर-२ पदे अशी एकूण ३ पदे हजर आहेत.
(२) व (३) सायबर पोलीस ठाणे येथे माहे मार्च, २०१६ पर्यंत गुन्ह्यांची नोंद ८३ इतकी आहे. सदर गुन्ह्यांची विभागणी पुढील प्रमाणे करण्यात आली आहे :-

अधिकाऱ्यांचे पद	गुन्ह्यांची संख्या
वरिष्ठ पोलीस निरीक्षक	०३
पोलीस निरीक्षक	३८
पोलीस निरीक्षक	४०
गुन्हा शाखा कक्ष-२	०२

पोलीस आयुक्तालयांतर्गत असलेल्या पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांची रिक्त पदे सायबर पोलीस ठाण्यातील रिक्त पदी स्थलांतरीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

जळगाव शहरात एका महिन्यात सुमारे १४ घरफोड्या झाल्याबाबत

(७) ६२९१३ (२३-०८-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव शहरात माहे मे, २०१६ या महिन्यात सुमारे १४ घरफोड्या झाल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घरफोडयातील किती आरोपींना अद्यापपर्यंत अटक करण्यात आली आहे तसेच त्यांच्याकडून किती मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे,
(३) तसेच सदर आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व प्रकरणाची सद्यस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) नाही.

माहे मे. २०१६ मध्ये जळगांव शहरात १४ घरफोडी घटना झालेल्या नसून ८ घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत.
(२) एकूण ८ घरफोडीच्या गुन्ह्यांपैकी १ गुन्ह्यात तक्रादार यांनी गैरसमजुतीने तक्रार दिल्याचे निष्पन्न झाल्याने सदर गुन्ह्यांची क वर्ग माध्यमातून निर्गती करण्यात आली आहे ७ गुन्ह्यांपैकी २ गुन्हे उघडकीस आणले असून सदर गुन्ह्यांत ६ आरोपीतांना निष्पन्न करुन अटक करण्यात आली असून अटक आरोपीतांकडून गुन्ह्यातील चोरीस गेलेले मुद्देमाल पैकी एकूण ७,१८,८००/- रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.
(३) सदर प्रकरणी आरोपी अटक कारवाई पूर्ण करण्यात आली असून त्यांचे माध्यमातून चोरीस गेलेल्या माल हस्तगत करण्यात आलेला आहे. उघडकीस आलेल्या २ गुन्ह्यापैकी एक गुन्ह्यात उपलब्ध ठोस पुरावा आधारे निष्पन्न २आरोपीतांविरुध्द प्रथमश्रेणी न्यायालयात दोषारोपपत्र पाठविण्यात आले आहे. त्यांचे विरुध्द प्रतिबंधक कारवाई करणेबाबत प्रभारी अधिकारी यांना मार्गदर्शन केले आहे. अन्य १ गुन्हा पोलीस तपासावर असून गुन्ह्यात निष्पन्न असलेले ४ आरोपींपैकी १ आरोपी सद्यस्थितीत कारागृहात बंद आहे. उर्वरित ३ आरोपी जामिनांवर सुटले असून त्यापैकी १ आरोपी विरुध्द क्रि.प्रो.को.क. ११० नूसार प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. उर्वरित ५ गुन्हे उघडकीस आणण्याचे सर्वतोपरी प्रर्यन करण्यात येत आहेत.
(४) विलंब झालेला नाही.

औंढा नागनाथ (जि.हिंगोली) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची नविन बांधलेली इमारत बंद असल्याबाबत

(८) ६६२४६ (१६-१२-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) : सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंढा नागनाथ (जि.हिंगोली) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने बांधलेली नविन इमारत मागील तीन वर्षापासून बंद असल्याने विद्यार्थ्यांची मोठया प्रमाणात गैरसोय होत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील वसतिगृह विद्यार्थ्यांना राहण्यास उपलब्ध करुन न देता तीन वर्षापासून कोणत्या कारणासाठी बंद ठेवण्यात आले आहे याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले तसेच सदरील नविन वसतिगृह विद्यार्थ्यांना राहण्यास उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०३-०७-२०१७) :(१) अंशत: खरे आहे.

प्रशिक्षणार्थ्यांसाठी बांधलेले प्रश्नाधीन वस्तीगृह इमारतीचे बांधकाम नोव्हेंबर, २०१४ मध्ये पुर्ण झाले आहे. परंतु, पाण्याची सोय उपलब्ध नसल्याने इमारतीचा ताबा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून घेता आला नाही.

(२), (३) व (४) होय, सदर प्रकरणी संचालनालयामार्फत चौकशी करण्यात आली आहे.

सदर चौकशीमध्ये, वस्तीगृहाचे जेथे बांधकाम झाले आहे, त्याठिकाणी बोअरवेल करण्यात आला होता, तथापि, बोअरवेलला पाणी लागले नसल्याने तसेच सदर भागात बोअरवेलना पाणी लागत नसल्याचेही आढळून आले. पाणी उपलब्ध नसल्याने सदर वस्तीगृह बंद अवस्थेत आहे.

औंढा नागनाथ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या इमारतीत व वस्तीगृह इमारतीच्या वास्तुपासून ९०० मीटर अंतरावरील औंढा येथील मंदीर परिसरातील ग्रामपंचायत औंढा यांच्या मालकीच्या विहीरीतून ५ बी. एच. पी. क्षमतेचा सबमर्सीबल पंप बसवून पाण्याच्या उपलब्धतेकरिता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांच्यामार्फत अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर अंदाजपत्रक संचालनालयास प्राप्त झाल्यानंतर ते जिल्हा नियोजन समितीकडे प्रशासकीय मंजूरीकरिता सादर करण्यात येईल.

राज्यात ऑन लाईन पद्धतीने गुन्ह्यांची नोंदणी करणेबाबत

(९) ६६७३४ (११-०१-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने सर्व राज्यात ऑन लाईन पद्धतीने गुन्ह्याचे (FIR) नोंदणी करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या बाबतीत आदेश काढले आहेत काय, तसेच सदर पद्धतीने गुन्हे नोंद झाल्यास गुन्ह्यांची आकडेवारी वाढलेली दिसेल म्हणून सदर पद्धतीने गुन्हे नोंद करण्याचे आदेश पोलीस विभागातर्फे काढले जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०७-२०१७) :(१), (२) व (३) केंद्र शासनाच्या निदेशानुसार राज्यात सीसीटीएनएस प्रकल्प दि.१५.०९.२०१५ पासुन कार्यान्वित झाला आहे. सदर प्रकल्पांतर्गत राज्यातील १०५४ पोलीस ठाण्यांमध्ये पुर्णपणे ऑनलाईन FIR नोंदणी केली जात आहे. सर्व गुन्ह्यांची या यंत्रणेवर ऑनलाईन नोंदणी करण्याचे आदेश पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी सर्व पोलीस कार्यालयास दिले आहेत. राज्यातील एकुण ६२७ वरीष्ठ पोलीस कार्यालये या प्रकल्पाशी जोडण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीची शाहूवाडी तालुक्यातील एक हजार एकर शेतजमीन हडप करण्याचा प्रयत्न झाल्याबाबत

(१०) ६६९०७ (१७-०१-२०१७). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीची शाहूवाडी तालुक्यातील एक हजार एकर शेतजमीन हडप करण्याचा प्रयत्न झाल्याचे सीआयडी चौकशीत माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये निष्पन्न् झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) : (१) नाही.

सदरची बाब ही सी.आय.डी. चौकशीत निष्पन्न झालेली नसुन चौकशी चालु असताना पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीचे तत्कालीन सचिव यांच्या प्रथम निदर्शनास आल्याने समितीकडून जुना राजवाडा पोलीस ठाणे येथे फिर्याद दिल्याने गुन्हा दाखल करणेत आलेला आहे.

(२) सदर प्रकरणी जुना राजवाडा पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ९७/२०१६ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१ प्रमाणे दि. ०४/०५/२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला असून सदर गुन्ह्याचा तपास जुना राजवाडा पोलीस ठाणे करीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

रुकडी (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील डॉक्टर दाम्पत्यांची झालेली हत्या

(११) ६७११६ (१६-०१-२०१७). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे रुकडी (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील डॉक्टर दाम्पत्यांची दिनांक ७ ऑगस्ट, २०१६ रोजी हत्या करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) होय हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी हातकणंगले पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १९९/२०१६ भा.दं.वि. कलम ३०२, ३९२, ४४९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी अंगुली मुद्रा, श्वानपथक, रेकॉर्ड वरील गुन्हेगार यांची तपासणी केली असून पारंपारिक व तांत्रिक अशा सर्व पध्दतीने सखोल तपास करुन गुन्हा उघडकीस आणण्याकरीता कसोशीने प्रयत्न करण्यात येत आहेत.
(३) विलंब झाला नाही.

पुणे शहरामध्ये पोलीस भरती करण्याचे आमिष दाखवून तरुणांची फसवणूक केल्याबाबत

(१२) ६७५७९ (१७-०१-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरामध्ये पोलीस भरती करण्याचे आमिष दाखवून २० तरुणांकडून एकूण ३० लाख रुपये घेवून फसवणूक करणाऱ्या एका आरोपीला सहकारनगर, पोलीसांनी दिनांक २१ सप्टेंबर, २०१६ रोजी अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी फिर्यादीचे तक्रारीवरुपन ४ आरोपींविरुध्द सहकारनगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २४४/२०१६ भा.दं.वि. कलम ४२०, ४६८, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्यातील चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींचे ताब्यातून एक स्विफ्ट डिझायर कार, बँक ऑफ महाराष्ट्र, सिंडीकेट बँक, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, युनियन, बँक, ओरीएंटल बँकेचे पासबुक जपत करण्यात आले आहे. आरोपींचे विरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

शिरुड (ता.जि.धुळे) येथे सुरु असलेले अवैध धंदे बंद करण्याबाबत

(१३) ६७८९५ (११-०१-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरुड (ता.जिधुळे) येथे अनेक वर्षापासून सुरु असलेले दारु निर्मितीसह विक्रीचे अवैध अड्डे, जुगार-सट्टयाचे अवैध धंदे तसेच चोरट्या मार्गाने होणारी गुटख्याची विक्री कायमस्वरूपी बंद करावी अशी मागणी करत शिरुड येथील महिलांनी माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर निदर्शने केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त अवैध धंद्याना प्रतिबंधीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) हे खरे नाही.
(२) सदर प्रकरणी धुळे तालुका पोलीस स्टेशन च्या हद्दीतील शिरुड दुरक्षेत्राचे कार्यक्षेत्रात सन २०१५ व २०१६ मध्ये महाराष्ट्र जुगार अधिनियमा अंतर्गत एकूण १३ छापे टाकून २० आरोपीना अटक करण्यात आली असून रुपये ११०५०/- रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तर महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमांतर्गत २७ छापे टाकून २७ आरोपीना अटक करण्यात आली असून रुपये ५५७७९/- रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.
(३) विलंब झालेला नाही.

कफ परेड (मुंबई) येथील मेकर टॉवर या इमारतीला आग लागल्याबाबत

(१४) ६९०४७ (११-०१-२०१७). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कफ परेड (मुंबई) येथील मेकर टॉवर या इमारतीच्या २० व २१ मजल्यावरील उद्योजक शेखर बजाज यांच्या फ्लॉटला दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ रोजी आग लागून संपूर्ण फ्लॅट जळून त्यामध्ये २ व्यक्ती होरपळून मृत्यूमुखी पडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी आग लागण्याची कारणे काय आहेत तसेच मृतांच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे काय,

(३) तसेच पोलीसांनी व अग्निशमन दलानी केलेल्या पंचनाम्यात निदर्शनास आलेल्या प्रमुख बाबी कोणत्या आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०६-२०१७) :(१) होय.

(२) विद्युत निरीक्षक, मुंबई निरीक्षण विभागाच्या अहवालानुसार सदर आग ही शॉर्ट सर्किटमुळे लागल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर घटना नैसर्गिक आपत्तीमध्ये मोडत नसल्यामुळे याप्रकरणी नुकसानभरपाई देय होत नाही.

(३) मेकर टॉवर ए विंग मधील २० व्या माळ्यावरील रुम नं. २०१ मधील श्री.शेखर बजाज हे राहात होते, तर २१ व्या माळ्यावरील रुम नं. २११ मध्ये श्री. अनंत शेखर बजाज हे राहात होते. सदर रुम नं. २०१ व २११ मध्ये आगीची घटना घडली आहे. या आगीमध्ये रुम नं. २११ मध्ये काम करणारे दोन नोकर होरपळून मृत्यूमुखी पडल्याचे निदर्शनास आले आहे.

याप्रकरणी कफ परेड पोलीस ठाणे येथे अपमृत्यू नोंद क्र. ४९/१६ तसेच ५०/१६, फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम १४७ अन्वये नोंद करण्यात आली आहे.

बुलढाणा कारागृहातील जखमी कैद्याचा कारागृह प्रशासनाचे हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याबाबत

(१५) ७०२९४ (१७-०१-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा कारागृहात जखमी कैद्याला सामान्य रुग्णालय, बुलढाणा येथून अकोला येथील रुग्णालयात संदर्भित करुनही कारागृह प्रशासनाने कैद्याला कारागृहातच परत नेल्याने कैद्याचा मृत्यू झाल्याचे दिनांक ९ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कारागृह प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे सदर जखमी कैद्याचा मृत्यू झाला असून शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०६-२०१७) :(१) बंद्यास दिनांक ०७.०९.२०१६ रोजी पोलीस पथकामार्फत सामान्य रुग्णालय, बुलढाणा येथे औषधोपचारासाठी पाठविण्यात आले असता वैद्यकिय सल्ल्यानुसार त्यांच्यावर उपचार करुन परत पाठविण्यात आले. तसेच दि. ८.९.२०१६ रोजी सदर बंद्यास सामान्य रुग्णालय, बुलढाणा येथे उपचार करुन त्यांना सामान्य रुग्णालय अकोला येथे रेफर करुन परत पाठविण्यात आले त्यानुसार त्यांना समान्य रुग्णालय, अकोला येथे उपचारासाठी पाठविण्याकरिता पोलीस पथकाची मागणी केली असता पथक उपलब्ध झाले नाही. सदर बंद्यास त्याच दिवशी त्रास होऊ लागल्याने तातडीने कारागृह रक्षकामार्फत सामान्य रुग्णालय, बुलढाणा येथे उपचारासाठी दाखल केले असता त्यांचा दि. ९.९.२०१६ रोजी मृत्यू झाला आहे.

(२) व (३) सन्मा. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, बुलढाणा तसेच स्थानिक गुन्हे शाखा, बुलढाणा यांचे मार्फत चौकशी करण्यात आली आहे. चौकशी अहवालानूसार या प्रकरणी कोणीही दोषी असल्याचे दिसून आलेले नाही.

भेंडा बु. (ता.नेवासा, जिअहमदनगर) येथील नागेबाबा मंदिरात झालेल्या चोरीबाबत

(१६) ७०३६७ (१७-०१-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भेंडा बु. (ता.नेवासा, जि.अहमदनगर) येथील देवस्थान नागेबाबा मंदिरात दिनांक ४ ऑगस्ट, २०१६ रोजी रात्री चोरी होऊन दान पेटी, सी.सी.टि.व्ही. सह सुमारे ९० हजार रुपयांची चोरी झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

दिनांक ५/८/२०१६ रोजी श्री.नागेबाबा मंदिरातून अज्ञात चोरट्यांनी ८९०००/- रु. किंमतीचे दानपेटी, सी.सी.टि.व्ही. कॅमेरा व मशीन, रोख रक्कम चोरुन नेली आहे.

(२) सदर प्रकरणी नेवासा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २०८/१६ भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा उघडकीस आणणेकरीता हद्दीत वेळोवेळी नाकाबंदी तसेच अभिलेखावरील गुन्हेगार तपासण्यात येत आहे. मात्र अजूनही आरोपी आढळून आले नसल्याने गुन्हा "अ" फायनल कायमस्वरुपी तपासावर ठेवण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

चितळी (ता.खटाव, जि.सातारा) येथील सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत चोरी झाल्याबाबत

(१७) ७०७०८ (११-०१-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चितळी (ता.खटाव, जि.सातारा) महादेव मंदिराच्या पाठीमागे असणा-या सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत चोरट्यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१६ रोजी चोरी करुन दोन हजार तोळे सोन्याचे दागिने असा सुमारे ७४ लाखांचा ऐवज पळविल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चोरट्यांना अटक करण्यात पोलीसांना यश आले आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) होय हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी सातारा जिल्ह्यातील वडूज पोलीस ठाणेत गु.र.नं. २६०/१६ भा.दं.वि.क. ४५७,३८० प्रमाणे दि.२१/१०/२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याचे तपासात एकुण ८ आरोपी निष्पन्न झालेले आहेत. त्यापैकी ३ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. यवत पोलीस ठाणे पुणे गु.र.नं. ६२२/१६ या गुन्ह्यात वडुज पोलीस ठाणेकडील गुन्ह्यात चोरीस गेलेल्या मालापैकी रु.१९,५६,००६/- इतक्या रकमेचे ७५२ ग्रॅम ३१ मिली वजनाचे सोन्याचे दागिने जप्त करुन एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा तपासा अद्याप सुरु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

जळगाव शहरामध्ये मटका, सट्टा, पत्ते, अवैध धंदे सुरु असल्याबाबत

(१८) ७२००२ (१७-०१-२०१७). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव शहरामध्ये मटका, सट्टा, पत्ते, अवैध लॉटरी सुरु असल्याचे तसेच चो-या, दरोडे, घरफोडी इत्यादी बाबी माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान तोंडी तक्रार व निवेदनाद्वारे स्थानिक लोकप्रतिनिधीनी पुराव्यानिशी जिल्हा पोलीस अधिक्षकांच्या निदर्शनास आणून दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर जिल्हा पोलीस प्रशासनमार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) नोव्हेंबर, २०१६ मध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींनी अवैध धंदे संदर्भात उपाययोजना करणेबाबत निवेदन दिले आहे.

(२) जळगांव शहर हद्दीत अथवा परिसरात कोणत्याही स्वरुपाचे अवैध धंदे सुरु नाहीत. पोलीसांची नजर चुकवून अवैध धंदे करणाऱ्या व अवैध धंद्यात सक्रिय राहणाऱ्या समाजकंटक गुन्हेगारांविरुध्द सातत्याने कारवाई करण्यात आलेली आहे. माहे ऑक्टोबर, २०१६ पावेतोचे कालावधीत जुगार (मटका, सट्टा, पत्ता इ.) सदरात एकुण १३३ केसेस करुन २५० आरोपीतांना अटक कारवाईसह रु. ६,५६,७०३/- इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच दारुबंदी या सदरात एकुण २९१ केसेस करुन २९५ आरोपीतांना अटक केली असुन संबंधीत गुन्हेगारांकडून रु.८,६३,७९८/- इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

शहर हद्दीत सक्तीची रात्रगस्त सह संशयित तसेच अभिलेखांवरल सर्व क्रियाशील गुन्हेगारांची नियमित पडताळणी सह आवश्यक प्रतिबंध कारवाई करण्यात येत आहे. नाउघड गुन्ह्यांमध्ये क्रियाशील संशयितांना तपासून गुन्हे उघडकीस आणणे कामी सातत्याने प्रयत्न सुरु आहेत.

(३) विलंब झालेला नाही.

पिंपळगाव (ब) (ता.निफाड जि.नाशिक) येथे सिलिंडर स्फोटात ३ व्यक्ती ठार झाल्याबाबत

(१९) ७२१०२ (१६-०१-२०१७). श्री.अनिल कदम (निफाड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळगाव (ब) (ता.निफाड, जि.नाशिक) येथे दिनांक ०३ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास सिलेंडर स्फोटात ३ व्यक्ती ठार झाल्या आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्फोटाची कारणे काय आहेत व स्फोटात मृत झालेल्यांना व जखमींना शासनाने किती नुकसान भरपाई दिली वा देण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) होय हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी पिंपळगाव (ब) (ता.निफाड, जि.नाशिक) पोलीस ठाणे येथे अकस्मात मृत्यू रजिस्टर नं. ४४/२०१६, सीआरपीसी कलम १७४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटना ही गॅस सिलेंडरची गळती होऊ लागलेल्या आगीमुळे घडली आहे. यात ४ जणांचा मृत्यू होऊन ३ जण जखमी झाले आहेत.

सदर स्फोटात मृतांच्या नोतेवाईकांना भारत गॅस कंपनीकडून प्रत्येकी रु.२५०००/- रुपयांची मदत मिळाली असून यापुढे लवकरात लवकर भारत गॅस कंपनीचे संबंधित इन्शुरन्स कंपनीकडून मयतांचे वारसांना प्रत्येकी सहा लाख रुपये मिळणार आहेत.

(३) विलंब झाला नाही.

पुणे येथील न्यायालयाच्या आवारात सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

(२०) ७२५१८ (१७-०१-२०१७). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे न्यायालयाच्या आवारात होणाऱ्या चोऱ्या, टोळीयुद्धातून झालेल्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर पाच वर्षापूर्वी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा प्रस्ताव प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०६-२०१७) :(१) व (२) पुणे व पिंपरी चिंचवड शहरामध्ये गृह विभागामार्फत राबविण्यात आलेल्या सीसीटीव्ही प्रकल्पाअंतर्गत पुणे न्यायालयाच्या आवारामधील दोन प्रवेशद्वारावर दोन सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. सदर सीसीटीव्ही कॅमेरे चालु सुस्थितीत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अहमदनगर शहरात मोठ्या प्रमाणात अवैध उद्योगधंदे सुरु असल्याबाबत

(२१) ७३१६० (११-०१-२०१७). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर शहरात मोठ्या प्रमाणात अवैध उद्योगधंदे सुरु असून घरफोड्या, चोऱ्या, सोनसाखळी चोरीच्या घटनेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अहमदनगर शहरातील अवैध धंदे, घरफोड्या, चोऱ्या या घटनांना प्रतिबंध करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) व (२) अहमदनगर शहरातील कोतवाली, तोफखाना, भिंगार कॅम्प या तीन पोलीस स्टेशन येथे सन २०१६ मध्ये घर फोडीचे ७७ गुन्हे दाखल असून १९ गुन्हे उघडकीस आले असून ५० आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून ३,३९,८८०/- रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

तसेच चोरीचे ३२४ गुन्हे दाखल असून त्यापैकी ७९ गुन्हे उघडकीस आले आहेत व २२४ आरोपीतांना कडून १५,९७,३५२/- रु. किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. तसेच सोनसाखळी चोरीचे ६१ गुल्हे दाखल असून त्यापैकी २० गुन्हे उघडकीस आले आहेत ४४५५००/- रु. किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

दारुबंदी या शिर्षकाखाली १८७ गुन्हे दाखल असून १९९ आरोपींना अटक करण्यात आली आहे व ८,३२,८३३/- रु. किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

जुगार या शिर्षखाली ३२१ गुन्हे दाखल असून ६९८ आरोपींना अटक करण्यात आली आहे व २६,७९,१३७/- रु. किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

गुन्हयाना प्रतिबंध घालण्यासाठी प्रभावी रात्रगस्त, बीट मार्शल पेट्रोलिंग, वेळोवेळी नाकाबंदी अशा उपाययोजना करण्यात येत आहेत.

(३) विलंब झालेला नाही.

नवी मुंबईतील सिवूड परिसरातील पोप्युलर फायनान्स कंपनीवर पडलेल्या दरोड्याबाबत

(२२) ७३८७० (२०-०४-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील सिवूड परिसरातील पोप्युलर फायनान्स कंपनीवर दिनांक ७ ऑगस्ट, २०१६ रोजी पडलेल्या दरोड्यात कंपनीच्या कार्यालयातील सुमारे ६,६९,३२,००० रुपये किंमतीचे २१ किलो ९९३ ग्रॅम ९०० मिली ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम ९ लाख ५० हजार रुपये लुटून नेल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दरोड्याचा तपास करुन पोलीसांनी आतापर्यंत किती दरोडेखोरांना अटक केली असून त्यांच्यावरील कारवाईची सद्यःस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०७-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी फिर्यादीचे तक्रारीवरून एनआरआय सागरी पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा रजि नं. १६९/१६ भादंवि ३९५,३९७,१२०(ब),४११,४१४ सह आर्म ॲक्ट ३,२५ सह मपोका ३७(१),१३५ सह महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा, १९९९ कलम ३(१) (II), ३(२),३(४) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. तसेच सदर गुन्हयामधील ६ दरोडेखोरांना अटक करून त्याचेविरूद्ध मा. विशेष न्यायालय, मोक्का कोर्ट ठाणे येथे दिनांक २८.१.२०१७ रोजी दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.

तसेच सदर गुन्हयात उपरोक्त नमुद ६ आरोपीव्यतिरिक्त आणखी ५ आरोपी निष्पन्न झालेले आहेत त्यांचा शोध घेणे चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर एमआयडीसी क्षेत्रामधील फर्नीचर व्यापारी यांना चमत्कारिक मोरपंखाचा आमीष दाखवून करण्यात आलेली फसवणूक

(२३) ७३९३१ (२१-०४-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर एमआयडीसी क्षेत्रामधील फर्नीचर व्यापारी यांना कत्थीत चमत्कारिक मोरपंखाचा २०० करोड रुपयांमध्ये सौदा करण्याचे आमीष दाखवून १३ लाख रूपयांची श्री. मुकेश रतनलाल गजभिये यांनी फसवणूक केल्याचे माहे डिसेंबर २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई स्थित जे.जे. ग्रुप ऑफ कंपनी या प्रकरणात सामील आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, नागपूर एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये सदर प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०७-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही आजपावेतो केलेल्या तपासात सदर कंपनीचा प्रत्यक्ष सहभाग दिसून येत नाही
(३) होय, हे खरे आहे.
(४) सदर प्रकरणी जे.जे. ग्रुप ऑफ कंपनी मोरपंख दोनशे करोड रुपायास विकत घेणार आहे व त्यात फिर्यादीला १५ टक्के कमिशनचे लालच देऊन अरोपींनी फिर्यादीस विश्वासात घेऊन फिर्यादीकडून मुव्हमेंट रकमेच्या नावाखाली रुपये १२,५०,०००/- व मोरपंख टेस्टीच्या वेळी रुपये १,००,०००/- घेवून अशाप्रकारे एकुण १३,५०,०००/- रुपयांची फसवणुक केली अशा फिर्यादीच्या तक्रारी वरुन ६ आरोपीविरुध्द एमआयडीसी पोलीस स्टेशन, नागपूर शहर येथे अपराध क्र.२९८३/२०१६ कलम ४०६, ४२०, ३४ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील २ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. गुन्हा तपासावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

माळशिरस तालुक्यातील (जि.सोलापूर) अनेक गावांमध्ये अवैध दारु विक्री सुरु असल्याबाबत

(२४) ७३९८९ (२०-०४-२०१७). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यातील अनेक गावांमध्ये अवैध दारु विक्री सुरु असल्याने ग्राहक प्रबोधन समिती, माळशिरस यांनी जिल्हा पोलिस प्रमुख, सोलापूर तसेच अकलूज, पोलिस ठाणे यांच्याकडे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करुन शासनामार्फत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०७-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.
(२) माळशिरस तालुक्यात अकलुज उप विभाग असून या उप विभागात अकलुज, माळशिरस नातेपुते, वेळापूर अशी एकूण चार पोलीस ठाणे आहेत.

सन २०१६ या वर्षात माळशिरस तालुक्यात चारही पोलीस स्टेशन मध्ये एकूण २९६ केसेस करुन ८,२९,३४१/- रु अवैध दारुचा मुद्देमाल जप्त करुन ३०७ आरोपी अटक करण्यात आलेले आहेत. अवैध दारुधंदे करणारे ५४ आरोपीवर मुंबई दारुबंदी अधि.कलम ९३ प्रमाणे उप विभागीय अधिकारी यांचकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेले आहेत.

जानेवारी २०१७ ते एप्रिल २०१७ या कालावधीत माळशिरस तालुक्यात एकूण १४४ केसेस करुन ३६,९०,६२२/- रु अवैध दारुचा मुद्देमाल जप्त करुन १३३ आरोपी अटक करण्यात आलेले आहेत. तसेच, चोरुन अवैध दारुधंदे करणारे २० आरोपीवर मुंबई दारुबंदी अधि.कलम ९३ प्रमाणे उप विभागीय अधिकारी यांचकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेले आहेत.

अवैध दारु धंद्याबाबत वेळोवेळी माहिती काढून तात्काळ कारवाई करुन सर्व अवैध धंदे समुळ नष्ट करण्याबाबत जिल्ह्यातील उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना सक्त सूचना देण्यात आलेले आहेत त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) विलंब झालेला नाही.

भिवंडी (जि.ठाणे) येथे पाच वर्षीय मुलीवर दोन अल्पवयीन मुलांनी अत्याचार केल्याबाबत

(२५) ७४१४३ (२०-०४-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथे पाच वर्षीय मुलीवर दोन अल्पवयीन मुलांनी अत्याचार केल्याची घटना माहे जानेवारी, २०१७ मध्ये पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर मुलांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१७) :(१) होय,

(२) सदर घटनेबाबत आरोपीविरुध्द भोईवाडा पोलीस स्टेशन गु.रजि.नं.। ०१/२०१७ भादंवि कलम ३७६, ३४ सह पोक्सो कायदा कलम ४, ६, ८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी अल्पवयीन मुलांना ताब्यात घेवून बाल न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना जामीनावर मुक्त केले आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ जिल्हयात मुलींची विक्री करणारी परप्रांतीय टोळीस अटक करण्यात आल्याबाबत

(२६) ७४१६४ (२०-०४-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील गरीब कुंटुबातील दोन मुलींना लग्नाचे आमीष दाखवून परप्रातांत विक्री करणाऱ्या टोळीस पोलीसांनी पकडण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरोपी मध्यप्रदेशातून यवतमाळ जिल्हयात उक्त गैरकारभार चालवित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन परप्रांतीय टोळयांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०७-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही, असा कोणताही प्रकार निदर्शनास आलेला नाही.

(३) सदर प्रकरणी ८ आरोपींविरूद्ध पोलीस स्टेशन, यवतमाळ शहर येथे अप. क्र. ४७२/१६ भादंवि कलम ३६३, ३६६, ३७६(२) (एन) सह कलम ४,६ पोक्सो प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयात ५ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरूद्ध मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे. तसेच उर्वरित ३ आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मु.पो.ता.मलकापूर (जि.बुलढाणा) येथे मोटार सायकल रॅलीला थांबविण्याकरीता गेलेल्या पोलीसांवर दगडफेक करण्यात आल्याबाबत

(२७) ७४१९३ (२०-०४-२०१७). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो.ता.मलकापूर (जि.बुलढाणा) येथे ईद-ए-मिलाप निमित्त परवानगी नसतानाही काढण्यात आलेल्या मोटार सायकल रॅलीला थांबविण्याकरीता गेलेल्या पोलीसांवर समाजकंटकांकडून झालेल्या दगडफेकीमध्ये लोकप्रतिनिधी, नगराध्यक्ष इत्यादीसह १० ते १५ पोलीस कर्मचारी, प्रतिष्ठीत नागरिक जखमी झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परवानगी नसलेल्या मार्गावरुन समाजकंटकांनी मोटार सायकल रॅली काढून आक्षेपार्ह व अर्वाच्च घोषणा देण्यास सुरुवात केली असता त्यांना रोखण्यात गेलेल्या पोलीसांवरच दगडफेक करण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी तपासात काय निष्पन्न झाले आहे व त्यानुसार किती समाजकंटकांविरुध्द व कोणत्या कलमाखाली गुन्हा नोंदविण्यात आला वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०६-२०१७) :(१) अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी मलकापूर शहर पोलीस ठाणे येथे गु. र. क्र. ४४२/२०१६ भादवी कलम ३०७, १४७, १४८, १४९, ३५३, ३३३, ३३२, ४२७, ४३५, १०९ सह १३५ मुपोका, ४/२५ आर्म ॲक्ट, ३, ४ सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रति. अधिनियम व ७ क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्टप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या चौकशीत आतापर्यंत एकुण १०५ प्रौढ, ९ विधी संघर्षित बालकांना अटक करण्यात आली आहे. उर्वरित व्यक्तींचा शोध सुरु असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर येथील कार्गो कंपनीची ७६ लाख रुपयांनी फसवणूक केल्याबाबत

(२८) ७४५२७ (२०-०४-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लॉजिस्टिक कंपन्याच्यां मागणीनुसार ठरलेल्या ठिकाणी माल पोहचवून दिल्यांनतरही मोबदला न देता नागपूर शहरातील सेन्ट्रल एव्हन्यूवर असलेल्या अग्रवाल यांचे कॅरियर्स व कॉर्गोचे या कंपनीची ७६ लाखांनी फसवणूक केली असल्याने याबाबत गणेशपेठ पोलीस ठाणे, नागपूर येथे गुन्हा दाखल करण्यात आले असल्याची धक्कादायक माहिती दिनांक २८ जानेवारी, २०१७ च्या सुमारास निर्देशनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने सखोल चौकशी केली आहे काय व त्याचा तपशिल काय आहे,
(३) असल्यास, या प्रकरणी संबधितावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०७-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणातील फिर्यादी यांनी आरोपी यांचेशी करार करुन कार्गोची सेवा पुरविली व सेवेच्या मोबदल्यात बिल तयार केले. आरोपींनी बिलाचे थोडेफार पैसे फिर्यादींना दिले परंतु, दि.१ जून, २०१६ ते दि.१ ऑगस्ट, २०१६ या कालावधीत अहमदाबाद व दिल्ली येथे पोहोचविलेल्या मालाचे ७६,६१,२०९/- रुपयांचा परतफेड न करता फिर्यादीची फसवणूक केल्यामुळे फिर्यादीच्या तक्रारीवरुन १० आरोपींविरुद्ध पोलीस स्टेशन, गणेशपेठ, नागपूर शहर येथे अपराध क्रमांक ३०/२०१७ कलम ४२०, ४६८ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील धर्मादाय विभागातील कामकाज सुधारण्यासाठी शासनाने नेमलेल्या कमिटीबाबत

(२९) ७४७०२ (२१-०४-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धर्मादाय विभागातील कामकाज सुधारण्यासाठी शासनाने कमिटी नेमली असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीचा अहवाल शासनाकडे सादर करण्यात आला आहे काय, असल्यास, सदर अहवालामध्ये धर्मादाय आयुक्त विभागाचे कामकाज सुधारण्यासाठी कोणत्या उपाययोजना सुचविण्यात आलेल्या असून उक्त उपाययोजनेची शासनाव्दारे अंमलबजावणी करण्यात येत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१७) :(१) नाही.

तथापि, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमांतर्गत प्रलंबित दाव्यामध्ये त्वरित निर्णय प्राप्त होण्यासाठी सदर अधिनियमात आवश्यक सुधारणा करण्यासाठी शासन निर्णय विधि व न्याय विभाग क्र. विपआ-१६१५/७०/प्र.क्र. २८/का. १५, दिनांक १३/०१/०१६ अन्वये श्री.अ.ज.ढोलकिया, निवृत्त धर्मादाय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सिन्नर (जि.नाशिक) चापडगाव आश्रमशाळेतील मुख्याध्यापकाने महिला कर्मचाऱ्यांवर केलेला अत्याचार

(३०) ७४९२३ (२०-०४-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर (जि.नाशिक) चापडगाव आश्रमशाळेतील मुख्याध्यापकाने वेळोवेळी अत्याचार केल्याची तक्रार तेथील महिला कर्मचाऱ्याने दिली असून त्यांच्या विरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०७-२०१७) :(१) होय.
(२) सदर प्रकरणी वावी पोलीस ठाणेस गुरनं.०१/२०१७ भादंवि कलम ३७६(१), ३७६(२)(क)(न), ३५४(अ) (१)(२), ५०६ सह अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक सुधारीत अधिनिय २०१५ चे कलम ३ (१)(डब्ल्यू)(१)(११), ३(२)(व्ही) अन्वये दि.३.१.२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीने मा.सत्र न्यायालय व मा.उच्च न्यायालय मुंबई येथे अटकपूर्व जामीनबाबत अर्ज केला होता. परंतु मा.न्यायालयाने जामीन फेटाळल्याने आरोपीस अटक करण्यात आले आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

चौल-भोवाळे (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील ज्युनियर कॉलेजमध्ये पेपर सुरू असतानाच शिक्षकाने विद्यार्थीनीचा विनयभंग केल्याबाबत

(३१) ७५०६७ (२१-०४-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चौल-भोवाळे (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील ज्युनियर कॉलेजमध्ये पेपर सुरू असतानाच शिक्षक तसेच अलिबाग पंचायत समितीचे विद्यमान सदस्य अनिल गोमा पाटील यांनी विद्यार्थीनीशी गैरवर्तन करून विनयभंग केल्याची तक्रार रेवदंडा पोलिस स्टेशनमध्ये विद्यार्थीनीने दाखल केल्याचे माहे जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रेवदंडा पोलीस स्टेशनमध्ये भा.दं.वि. कलम ३५४ (अ), पोस्को कलम ११, १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हेगारास अटक करुन कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१७) :(१) होय.
(२) सदर घटनेबाबत रेवदंडा पोलीस ठाणे गुरनं.०९/२०१७ भादंवि कलम ३५४(अ) सह लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ११, १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयातील आरोपीस अटक करुन मा.न्यायालयात हजर केले असता, मा.न्यायालयाने आरोपीस जामिनावर मुक्त केले आहे. तपासाअंती दिलेली फिर्याद ही गैरसमजूतीने दिल्याचे निष्पन्न झाल्याने सदरचा गुन्हा क समरी मंजुरीकरिता मा.न्यायालयात पाठविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

गडचिरोली पोलीसांकडून छतीसगड येथील दोन तरुणींवर झालेल्या अत्याचाराबाबत

(३२) ७६६७६ (२१-०४-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिदूंर (ता.एटापल्ली, जि.गडचिरोली) येथील जंगलात नक्षलवाद्यांबरोबर झालेल्या चकमकीदरम्यान हाती लागलेल्या छतीसगडमधील दोन आदिवासी तरुणीवर पोलीसांनी अत्याचार केल्याचे आरोप संबधित मुलींनी केला असल्याची माहिती दिनांक २८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीसांनी बदनामी केल्याचा आरोप लावून मानसिक छळ सुरू केल्याप्रकरणी उक्त दोन्ही तरुणींनी नागपूर न्यायालयात खटला दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एटापल्ली पोलीसांनी बदनामीच्या भितीपोटी आणि स्वत:वरील कारवाई टाळण्यासाठी दोन्ही तरुणींचा शोध घेवून त्यांना नागपूरमध्ये अटक करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०७-२०१७) :(१) हे खरे नाही

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) दि.२०.१.२०१७ रोजी पोलीस पथक नैताला जंगल परीसरात नक्षल विरोधी अभियान राबवित असताना पोलीस पथकाला दोन महिला व एक पुरुष संशयीतरीत्या पायी येताना दिसले. त्यांच्या विचारपूस दरम्यान अंधारल्याने व सदर परिसरात नक्षलवादी व हिंस्त्र प्राणी असल्याने त्यांना पोलीस पथकाच्या सुरक्षेमध्ये मुक्कामास ठेवण्यात आले.

दि.२१.१.२०१७ रोजी नैताला गावात सदर तीनही इसमांची ओळख पटल्यावर त्यांना पोलीस पाटील व गावकरी यांचे ताब्यात देवुन स्टेशन डायरीत नोंद घेण्यात आली.

दि. २२.०१.२०१७ रोजी सैनु गोटा व त्याची पत्नी यांनी गावकरी यांना घेऊन पोलीस मदत केंद्र पोमके गटटा (जा.) येथे मोर्चा आणुन दोन्ही महिलांवर पोलीसांनी अत्याचार केला आहे अशी तक्रार दिली.

दोन्ही महिलांनी मा.न्यायालयात पोलीसांनी आमचेवर कोणताही अत्याचार केला नाही उलट पोलीसांनी आम्हाला जेवण व निवारा दिला. सुखरुप आमच्या नातेवाईकाच्या ताब्यात दिले होते. परंतु आरोपी सैनू गोटा व त्याची पत्नी यांनी पोलीसांनी अत्याचार केला असे खोटे सांगण्याकरिता आमचेवर दबाव आणला होता असे सांगितले.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर (जि.ठाणे) येथील मोलकरणीवर चार वकिलांनी सामूहिक बलात्कार केल्याबाबत

(३३) ७६७३८ (२१-०४-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.योगेश सागर (चारकोप), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर-४ (जि.ठाणे) येथील ओटी सेक्टर परिसरात ४५ वर्षाच्या मोलकरणीवर वकील असलेल्या उल्हास मोरे, सतीश मोरे, दीपक शहा व निकुंज रावल यांनी सामूहिक बलात्कार केल्याचे प्रकरण माहे डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त महिलेच्या तकारीवरुन विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात यासंदर्भात गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त दोषी वकिलांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१७) :(१) होय.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी विठ्ठलवाडी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.। ३६३/२०१६ भादंवि कलम ३७६, ३७६(ड), ३४२, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयातील आरोपी क्र.१ यास अटक करण्यात आले असून, दोन आरोपी महिलांना मा.न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे, तीन आरोपींना मा.सत्र न्यायालयाने अटकपूर्व जामीन नामंजूर केल्याने त्यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे अर्ज केला आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण-डोंबिवली शहरातील वाढत्या चोऱ्या आणि सोनसाखळीच्या घटनांना प्रतिबंधीत करण्यासाठी सीसीटीव्ही बसविण्याबाबत

(३४) ७७७५३ (२०-०४-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली शहरातील वाढत्या चोऱ्या आणि सोनसाखळीच्या घटनांना प्रतिबंधीत करण्यासाठी सदर परिसरातील ७६८ सीसीटीव्हींच्या माध्यमातुन अंकुश ठेवला गेल्यास चोऱ्याच्या घटनांना अंकुश बसणार असतांना याबाबत शासनाने दुर्लक्ष केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने गंभीर दखल घेऊन याबाबत उपाययोजनात्मक कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०७-२०१७) :(१) व (२) कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात सीसीटीव्ही प्रकल्प राबविण्यास व त्यासाठी येणाऱ्या रुपये ५०.६५ कोटी एवढ्या निधीच्या खर्चास उच्चस्तरीय समितीने माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या मान्यतेच्या अधीन प्रशासकीय मान्यता दिली आहे. त्यानुसार माहिती व तंत्रज्ञान विभागाची मान्यता घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

रतन इंडिया कंपनीच्या कामगारांनी केलेले आंदोलन

(३५) ७७८०५ (२१-०४-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ. डवरगाव (ता.जि.अमरावती) रतन इंडिया कंपनीच्या कामगारांनी दिनांक १२ ऑक्टोबर, २०१६ रोजी कंपनीच्या प्रवेश द्वारावर आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीतील कामगारांच्या मागण्यासंदर्भात मा.तहसीलदार अमरावती यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीचा अहवाल मा.जिल्हाधिकारी अमरावती यांना दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६ रोजी सादर करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवालात कामगार आयुक्त या कंपनीविरुद्ध कारवाई करीत नसल्याने कामगार आयुक्त अमरावती यांचेविरुद्ध कारवाई करण्याची कामगारांची मागणी असल्याचे नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कामगारांवर अन्याय करणा-या कंपनीला मदत करणा-या कामगार आयुक्त, अमरावती यांचेविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) असल्यास, कामगारांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करणा-या रतन इंडिया या कंपनीविरुद्ध शासन कोणती कारवाई करणार वा करीत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२९-०६-२०१७) :(१) कंपनीच्या कामगारांनी दिनांक १२/१०/२०१६ रोजी कंपनीच्या प्रवेशाद्वारावर आंदोलन केले होते. तथापि संबंधित तहसिलदारांनी व्यवस्थापन व आंदोलक यांच्यात घेतलेल्या बैठकीतील चर्चेअंती सदर आंदोलन संपुष्टात आलेआहे, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) सदरहू अहवालात कंपनी विरुध्द कारवाई करीत नसल्याने संबधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची कामगारांची मागणी असल्याचे नमुद असले तरी प्रत्यक्षात सहाय्यक कामगार आयुक्त, अमरावती यांनी उक्त आस्थापनेविरुध्द नियमानुसार उचित कार्यवाही करुन विविध कामगार कायद्यांतर्गत व्यवस्थापना विरुध्द ३ व कंत्राटद्वारांविरुध्द ८ असे एकूण ११ खटले दाखल केले असून सर्व खटले न्यायप्रविष्ठ आहेत. तसेच सदर कंपनी विरुध्द कंत्राटी कामगार अधिनियम, १९७० अंतर्गत कंत्राटी पध्दतीचे निर्मुलन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

नवी मुंबईमधील नेरुळ येथील एमजीएम शाळा व महाविद्यालयाच्या इमारतीच्या शौचालयात गर्भपात झाल्याची घटना घडल्याबाबत

(३६) ७७९९७ (२०-०४-२०१७). ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.विजय औटी (पारनेर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईमधील नेरुळ येथील एमजीएम शाळा व महाविद्यालयाच्या इमारतीच्या शौचालयात गर्भपात झाल्याची घटना घडली असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळा शिक्षकाने विद्यार्थीनीवर बलात्कार केल्याच्या आरोपामुळे शाळा वादात सापडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गुन्हे शाखेमार्फत अटकेतील शिक्षक, शाळा व्यवस्थापन व संबंधित शिक्षकाची चौकशी सुरु असतानाच हा प्रकार घडला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार बलात्कार करणाऱ्या शिक्षकावर व शाळा व्यवस्थापनेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१७) :(१) अंशत: खरे आहे.

एम.जी.एम.स्कुल नेरुळ येथे लेडीज टॉयलेटमध्ये एक लहान चेंडूच्या आकाराचा मांसाचा गोळा मिळून आला होता. तक्रारीवरुन याबाबत गुन्हा नोंदविला होता. परंतु न्यायवैद्यकीय प्रयोगशाळेत सदर मांसाचा गोळा मध्ये रक्त किंवा कोणतेही टिश्यु अस्तीत्वात नाही असे आढळून आले.

(२) होय.

(३) होय.

(४) एम.जी.एम.स्कुल नेरुळ येथे लेडीज टॉयलेटमध्ये एक लहान चेंडूच्या आकाराचा मांसाचा गोळा मिळून आल्याप्रकरणी प्राप्त तक्रारीवरुन नेरुळ पोलीस ठाणे गु.र.नं.। ५२४/२०१६ भादंवि कलम ३१२, ३१५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर मांसाचा गोळाच्या

न्यायवैद्यक परिक्षण अहवालात गोळयात रक्त किंवा कोणतेही टिश्यु मिळून आला नाही. गुन्हयाचे कागदपत्राचे अवलोकन करुन क वर्गात तपास समरी तयार करण्यात आला आहे.

शाळेच्या शिक्षकाने विद्यार्थीवर बलात्कार केल्याचे विद्यार्थीनीच्या तक्रारीवरुन नेरुळ पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं.३९०/२०१६ भादवि ३७६(एफ)(आय) (एन), ५०६ (ब) सह पोस्को कलम ४, ५, (फ), (एल), (जे-२), ६, ८, ९ (फ), १० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीस अटक करण्यात आले असून, शाळा व्यवस्थापनाने शाळेचे मुख्यध्यापीका यांचे निलंबन केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकडून बीजभांडवल उपलब्ध होण्याबाबत

(३७) ७८०१५ (२०-०४-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात आर्थिकदृष्टया मागासलेल्यांच्या विकासासाठी स्थापन झालेल्या अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकडून मागील १४ वर्षात फक्त चारच तरुणांना बीजभांडवल उपलब्ध झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्जाकरीता आवश्यक असलेल्या कागदपत्रांची यादी एवढी मोठी आहे की त्यामुळे अनेक सुशिक्षित तरुण कर्ज घेण्याकरिता जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या महामंडळाकडून सुशिक्षित तरुणांना सुलभरित्या कर्ज उपलब्ध करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२१-०६-२०१७) :(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील पहिले कौशल्य विकास केंद्र हे ठाणे रेल्वे स्थानकानजीकच्या गावदेवी मंडईच्या इमारतीत असल्याबाबत

(३८) ७८०७१ (२१-०४-२०१७). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) : सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पहिलेच कौशल्य विकास केंद्र हे ठाणे रेल्वे स्थानकानजीकच्या गावदेवी मंडईच्या इमारतीतील १३ हजार स्क्वेअर फूटाचे प्रशस्त आणि संपूर्ण सुविधायुक्त असे ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाने सुरु केले असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त केंद्रात विद्यार्थ्यांना विविध प्रकारची कौशल्ये मोफत शिकवली जाणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर केंद्रात विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्याबाबत प्रशासनाने कोणत्या अटी व शर्ती घातल्या आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२०-०६-२०१७) :(१) अंशत: खरे आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे पुरस्कृत ठाणे रेल्वेस्थानकानजिकच्या गावदेवी मंडईच्या इमारतीतील दुसऱ्या मजल्यावर १० हजार स्क्वेअर फूट इतक्या जागेत संपूर्ण सुविधायुक्त राज्यातील पहिलेच कौशल्य विकास केंद्र सुरू केले आहे. सदरचे केंद्र जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांचे प्रतिनिधी व ॲग्नेल इन्स्टीट्युट ऑफ टेक्नीकल ट्रेनिंग ॲण्ड इन्टरप्रीनीयरशिप डेव्हलपमेंट बांद्रा (प.) यांच्यात झालेल्या सामंजस्य करारानुसार (MoU) सुरु झाले आहे.

(२) होय.

सदर कौशल्य विकास केंद्रामध्ये मोफत कौशल्य प्रशिक्षणाची सोय उपलब्ध आहे.

(३) सदर कौशल्य विकास केंद्रात प्रवेश घेण्याबाबत खालीलप्रमाणे अटी आहेत.

अ) प्रवेश घेण्यास इच्छुक असणारा विद्यार्थी हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

ब) प्रशिक्षणार्थीचे वय १५ ते ४५ वर्ष असावे.

भांडुप पश्चिम (मुंबई) गाढव नाका परिसरात सोनसाखळी चोरी, मारामारी आणि गुन्हयाचे प्रमाण वाढले असल्याबाबत

(३९) ७८२७० (२१-०४-२०१७). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडुप पश्चिम (मुंबई) गाढव नाका परिसरातील रहदारी बाजारपेठ आणि वर्दळ असलेल्या ठिकाणी सोनसाखळी चोरी, मारामारी आणि गुन्हयाचे प्रमाण वाढले असल्यामुळे अशोक केदार चौकातील एका मोकळया जागेवर पोलीस चौकी उभारण्याची मागणी नागरिकांनी करुनही शासनाने याकडे पूर्णतः दुर्लक्ष केल्याने नागरीकांनी वर्गणी गोळा करून तात्पुरते बांधकाम केलेल्या पोलीस चौकीला महापालिकेने तोडून टाकल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरीकांना संरक्षण मिळावे आणि सुरक्षतेची भावना निर्माण व्हावी यासाठी शासनाने पोलीस चौकी निर्मीतीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०६-२०१७) :(१) सहायक अभियंता, एस वॉर्ड कार्यालय, भांडूप पश्चिम, मुंबई यांनी दिनांक १३.०१.२०१७ रोजी भांडूप पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील अनधिकृत कच्च्या/पक्क्या बांधकामाचे निष्कासन केले आहे.

(२) भांडूप पोलीस ठाण्याकडून पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये रहदारीच्या ठिकाणी वेळोवेळी नाकाबंदी व गस्तीचे आयोजन करण्यात येत असल्याने सदर परिसरातील सोनसाखळी चोरीला आळा बसला असून सोनसाखळी गुन्हे घडण्याच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात घट झालेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे परिसरात टेलीशॉपिंग कंपन्यांच्या विरोधात गत वर्षभरात ४५ तर राज्यात ९८३ तक्रारी प्राप्त झाल्याबाबत

(४०) ७८६१६ (२१-०४-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.धैर्यशील पाटील (पेण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टीव्हीवरील जाहिराती आणि इंटरनेटच्या माध्यमातून विविध बनावट उत्पादनाची विक्री करून टेलिशॉपिंग कंपन्यां ग्राहकांची फसवणूक करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत वर्षभरात ठाण्यात एकूण ४५ तर राज्यात तब्बल ९८३ तक्रारी पोलीस ठाण्यात दाखल झाल्या असून प्रत्यक्षात किती तक्रारींच्या संदर्भात तपास करून संबंधित गुन्हेगारांविरूद्ध कारवाई करण्यास पोलीसांना यश प्राप्त झाले आहे,

(३) असल्यास, पोलीसांच्या सायबर सेलने उक्त प्रकरणाचा तपास करताना टीव्हीवरून जाहीरात करणाऱ्या बहुतांशी कंपन्या आपल्या टोल फ्री क्रमांक ठाणे जिल्हयामधून हाताळत असून इंटरनॅशनल कॉल सिस्टीमचा वापर करीत असल्याने त्यांचा नेमका ठावठिकाणा शोधणे सायबर पोलीसांना कठीण जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, टेलिशॉपिंग कंपन्यांद्वारे ग्राहकांच्या होणाऱ्या फसवणूकीस परिणामकारकरित्या प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) होय. हे खरे आहे.

(२) यासंदर्भात पोलीस आयुक्त, पुणे येथे एक गुन्हा तसेच पोलीस आयुक्त, नागपूर येथे दोन गुन्हयांची नोंद झालेली आहे. याव्यतिरिक्त राज्यातील अन्य जिल्हयात कोठेही अशा प्रकारच्या तक्रारी वा गुन्हे पोलीस ठाण्यात दाखल नाहीत.

तथापि, राज्य ग्राहक आयोग, मुंबई, तसेच राज्य आयोगाचे परिक्रमा खंडपीठे नागपूर/औरंगाबाद व अधिनस्त एकूण ४० जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच कार्यालये कार्यरत आहेत. अधिनस्त जिल्हा मंचात फेब्रुवारी, २०१७ अखेर एकूण ४५ तक्रारी दाखल झालेल्या आहेत. त्यापैकी १७ तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत.

पोलीस आयुक्त, ठाणे यांच्या कार्यक्षेत्रात सदर प्रकरणी एकही तक्रार वा गुन्हा दाखल नसल्याने, पोलीस आयुक्त, ठाणे यांच्या घटकाची माहिती निरंक आहे.

(३) होय हे अंशत: खरे आहे.

(४) टेलिशॉपिंग कंपन्यांद्वारे ग्राहकांच्या होणाऱ्या फसवणूकीस परिणामकारकरित्या आळा घालण्याच्या दृष्टीने शाळा, कॉलेज, हौसिंग सोसायटी येथे जनजागृती कार्यक्रम घेण्यात येतात.

तसेच यादृष्टीने पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची कार्यशाळा आयोजित करुन अशा गुन्हयांना प्रतिबंध आणण्याचा प्रयत्न केला जातो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर शहरासह जिल्हयात गुन्हांचे प्रकरण वाढत असल्याबाबत

(४१) ७८८७८ (२१-०४-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरासह जिल्हयामध्ये अनेक महिला व अल्पवयीन मुलींवर बलात्कार, हत्या, हल्ले, गोळीबार, टोळीयुध्द, चेनस्नेचिंग अशा अनेक घटना दिनांक २२ डिसेंबर, २०१६ ते ४ फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत घडल्या असून सदर प्रकारच्या घटनेत दिवसेंदिवस वाढ होत असूनही गुन्हेगारीवर आळा घालण्यास पोलीस विभाग, वाहतुक विभागाचे अधिकारी व कर्मचारी अपयशी ठरत असल्यामुळे नागपूर शहरातील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले असल्याची माहिती दिनांक ३ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे व त्याचा तपशिल काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१७) :(१) हे खरे नाही,

सदर प्रकरणातील नागपूर शहर पोलीस आयुक्तालयामधील सन २०१५ मधील एकुण १००३३ गुन्हे दाखल असून, सन २०१६ मध्ये एकुण ९७२० गुन्हे दाखल आहेत. सदर दोन वर्षाच्या तुलनेत गुन्हयामध्ये घट झाली आहे.

तसेच नागपूर ग्रामीण जिल्हयात दि.२२.१२.२०१६ ते दि.४.२.२०१७ या कालावधीत बलात्कारचे ८, हत्या ३, हल्ले २, चेनस्नेचिंग १ गुन्हे घडले असून, मागील वर्षी बलात्कार ७, हत्या ७ व चेनस्नेचिंग २ प्रमाणे गुन्हे घडले आहेत. गोळीबार, टोळीयुध्द ही गुन्हे निरंक आहेत.

(२) उपरोक्त दाखल गुन्ह्यातील आरोपींना अटक केले आहे. दोषारोपपत्र दाखल केले आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे. तसेच दरोड्यातील आरोपींना शस्त्रानिशी अटक केली आहे, २६ गुन्हयातील १३२ आरोपींना अटक केली आहे. मकोका अंतर्गत २३ गुन्हयाची नोंद असून, ११७ सराईत संघटीत गुन्हेगारांना अटक केली आहे. एम.पी.डी.ए. अंतर्गत ३२ गुन्हेगारांना कारागृहात स्थानबध्द केले आहे. त्यामुळे गुन्हेगारांवर नागपूर शहर पोलीसांचे चांगले नियंत्रण असल्याचे दिसून येते. नियमित ग्रामभेट, पेट्रोलींग व मोहल्ला कमेटी, शांतता कमेटीची मिटींग घेण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील गृह विभागातील महत्वाची कामे खाजगी विधी कंपन्यांना देण्याच्या प्रस्तावाबाबत

(४२) ७९६४० (२१-०४-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गृह विभागातील महत्वाची कामे खाजगी विधी कंपन्यांना देण्याच्या प्रस्तावाला दिनांक १९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास शासनाने मान्यता देऊन लक्ष्मीकुमारन व श्रीधरन, लिंक लिगल इंडिया लॉ सर्व्हिसेस व तुली ॲण्ड कंपनी या तीन खाजगी विधी कंपन्यांना मूळ कायदे, नियम, अधिसूचना यांचे प्रारुप तयार करणे, अस्तित्वात असलेल्या कायद्यात नियमांमध्ये बदल करणे, विभागाला कायदेविषयक सल्ला देणे, आवश्यकतेनुसार उच्च व सर्वोच्च न्यायालयात विभागांची बाजु मांडणे इ.सेवा पुरविण्यासाठी मान्यता दिल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गृह तसेच विधी व न्याय विभागातील सध्या कार्यरत असलेल्या विविध अधिकाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन देण्यात येत असतानाही सदर काम खाजगी कंपन्यांना देण्याच्या धोरणात्मक निर्णयाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर अति महत्वाची कामे खाजगी विधी कंपन्यांना देण्याकरीता टेंडर पध्दती अवलंबिण्यात आली आहे काय, असल्यास, उक्त कंपन्यांना दरवर्षी किती रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला असून कामाची गोपनीयता राखण्याबाबत त्यांच्याशी करण्यात आलेल्या करारातील अटीशर्तीचे नियम काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) होय हे खरे आहे.

(२), (३) व (४) गृह विभागात अनेक गुंतागुंतीचे व व्यापक कायदेविषयक प्रश्न उदभवतात तसेच नवीन कायदा तयार करणे, अधिसूचना तयार करणे, सेवाप्रवेश नियमात बदल करणे इत्यादी तदनुषंगिक बाबी आपले विहीत कामे सांभाळून वेळेवर पूर्ण कराव्या लागतात.

त्यामुळे त्यांचे मदतीसाठी सदरहू विधी सल्लागार संस्थांच्या सेवांची आवश्यकता विचारात घेऊन या संस्थांना नामिकासूचीवर (Empanelment) घेण्यात आले आहे. सदर सल्लागार संस्था विभागाच्या नियमित कामकाजात सहभागी होणार नसून त्यांना विवक्षीत कामे नेमून दिले जातील. सदर विधी सल्लागार संस्था त्यांना दिलेल्या कामासंदर्भात विभागातील संबंधीत अधिकारी व विधी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली नेमून दिलेले व नियमानुसार विधी व न्याय विभागाची मान्यता घेऊन, विहीत पातळीवर निर्णय घेण्यात येतील, तसेच आवश्यकतेनुसार गोपनीयता ठेवली जाईल. त्यामुळे मंत्रालयीन अधिकारी/कर्मचारी यांच्या कार्यक्षमतेबद्दल प्रश्न उपस्थित होण्याचा किंवा गोपनीयता न पाळण्याचा प्रश्न उद्दभवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

बुलढाणा जिल्ह्यात इमारत व इतर बांधकाम कामगारांचे पाल्य शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याबाबत

(४३) ८०२७९ (२१-०४-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्यावतीने बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीपासून १०२ विद्यार्थी वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (३०-०६-२०१७) :(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला, वाशिम, बुलढाणा जिल्ह्यातील एकाही धान्य गोदमाची कायद्याप्रमाणे नोंद न केल्याबाबत

(४४) ८०७४५ (२१-०४-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला, वाशिम, बुलढाणा जिल्ह्यातील एकाही धान्य गोदामाची कायद्याप्रमाणे नोंद न केल्याने अकोला विभाग माथाडी मंडळाने राज्य वखार महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांना नोटीस बजावली असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने गोदामांची नोंद करुन तेथे काम करणा-या कामगारांना कामगार कायद्याप्रमाणे लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (३०-०६-२०१७) :(१) महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ व अकोला, वाशिम, बुलढाणा जिल्हा हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना, २००३ अकोला, वाशिम, बुलढाणा जिल्ह्यास लागू करण्यात आली आहे. यानुसार मालक नोंदणी, नोंदित कामगारांचा रोजगार अखंडीतपणे सुरु राहणे व नोंदित कामगारांची मजूरी व लेव्हीची रक्कम मंडळात नियमित जमा होणे यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत अकोला, वाशिम, बुलढाणा जिल्हा माथाडी मंडळाने व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे यांना दि.२१.१२.२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे, हे खर आहे.
(२) अकोला, वाशिम, बुलढाणा जिल्हा माथाडी मंडळाच्या अखत्यारित महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाची ४ गोदामे आहेत. सदर गोदामामध्ये ३ कंत्राटदारांमार्फत माथाडी कामगार कार्यरत आहेत. या ३ कंत्राटदारांपैकी २ कंत्राटदार मंडळात नोंदित असून, त्यांच्याकडे एकूण ८२ कामगार कार्यरत आहेत व सदर कामगारांना माथाडी कायद्याप्रमाणे लाभ दिले जात आहेत. तिसऱ्या कंत्राटदारास नोंदित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

हिंगणघाट व समुद्रपूर तालुक्यातील (जि.वर्धा) शासकीय कार्यालयामधील रिक्त पदे भरण्याबाबत

(४५) ८१४५३ (२१-०४-२०१७). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणघाट व समुद्रपूर तालुक्यातील (जि.वर्धा) बहुतांशी शासकीय कार्यालयामध्ये कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याने नागरिकांच्या कामांमध्ये अत्यंत अडचणी निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त दोन्ही तालुक्यातील रिक्त पदे त्वरीत भरण्याबाबत कोणती तातडीची कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१७) :(१) वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट व समुद्रपूर या तालुक्यांतील शासकीय कार्यालयांमध्ये काही प्रमाणात पदे रिक्त आहेत. मात्र या कार्यालयांतील उपलब्ध अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून अतिरिक्त वेळेत दैनंदिन कामकाजाचा निपटारा करण्यात येतो.

(२) उक्त दोन्ही तालुक्यांमधील शासकीय कार्यालयातील रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने राज्य शासनाच्या प्रचलित धोरणानुसार/ कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, वर्धा तसेच संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

कामगार कल्याण मंडळामार्फत नोंदणी करतांना वर्षातून ९० दिवसांचे प्रमाणपत्र कंत्राटदार किंवा स्थानिक प्राधिकरण यांच्याकडून घेणे बंधनकारक असल्याबाबत

(४६) ८१९६० (२०-०४-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र शासनाने इमारत बांधकाम कामगार यांचेकरिता कामगार कल्याण मंडळामार्फत नोंदणी करतांना वर्षातून ९० दिवसांचे प्रमाणपत्र कंत्राटदार किंवा स्थानिक प्राधिकरण यांच्याकडून घेणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अटीमुळे ग्रामीण भागातील मजूरांची नोंदणी होत नसल्याने त्याचा फायदा गावातील मजूरांना मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (३०-०६-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

ग्रामीण भागातील मजुरांची नोंदणी करण्याकरीता दि. २५.२.२०१३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणा-या कामगारांची नोंदणी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात करण्यासाठी जिल्हा स्तरावर समन्वय समिती गठीत करण्यात आली आहे. त्यानुसार आतापर्यंत ११५५८ बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात आलेली असून त्यापैकी २३९४ पात्र लाभार्थ्यांना मंडळाच्या विविध योजनेंचा लाभ देण्यात आला आहे.

तसेच, दि.१३.८.२०१४ रोजीच्या शासन अधिसूचनेद्वारे ज्या बांधकाम कामगारांचे काम सातत्य नसलेले/अस्थायी/ दैंनंदिन (Casual)स्वरुपाचे आहे आणि त्यामुळे कामगारांना एका पेक्षा जास्त मालकांकडे काम करावे लागते अशा बांधकाम कामगारांना संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने प्राधिकृत केलेल्या अधिका-याने निर्गमित केलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात नोंदणी करता येते. त्यामुळे ९० दिवसांचे प्रमाणपत्र या अटीमुळे ग्रामीण भागातील मजूर नोंदणी होत नसल्याचे व परिणामी त्याचा फायदा गावातील मजुरांना मिळत नाही हे म्हणणे संयुक्तिक नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मशाव या इस्त्रायली शेती पद्धतीचे प्रशिक्षण राज्यातल्या पावणेतीन लाख शेतकऱ्यांना देण्याबाबत

(४७) ८१९८२ (२१-०४-२०१७). डॉ.तुषार राठोड (मुखेड) : सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रतिकुल वातावरणावर मात करुन शेतीचे उत्पन्न वाढवण्यास मदत करणाऱ्या मशाव या इस्त्रायली शेती पद्धतीचे प्रशिक्षण राज्यातल्या पावणेतीन लाख शेतकऱ्यांना देण्यासाठी सकाळ इंटरनशनल लर्निंग सेंटर (एसआयएलसी), शासनाच्या कौशल्य प्रशिक्षण विभाग, इस्त्राईल मधील हिब्रू विद्यापीठ आणि पॅलेडियम ग्रुप यांच्यात मा.मुख्यमंत्री यांच्या उपस्थित सामंजस्य करार करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पद्धतीच्या प्रशिक्षणामुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२०-०६-२०१७) :(१) अंशत: खरे आहे.

राज्यात कृषि क्षेत्रामध्ये कौशल्य प्रशिक्षण देण्याबाबत कौशल्य विकास व उद्योजकता विभाग तसेच सकाळ इंटरनॅशनल लर्निंग सेंटर, पुणे (SILC) यांच्यात माहे जानेवारी-२०१७ मध्ये सामंजस्य करार करण्यात आलेला आहे.

त्यानुसार राज्यातील शेतकऱ्यांना सकाळ इंटरनॅशनल लर्निंग सेंटर, पुणे (SILC) मार्फत वैयक्तिक तसेच गट कौशल्य प्रशिक्षण देण्याबाबत प्रस्ताव प्राप्त झाला आहे. त्यानुसार, सदर प्रकल्पात सकाळ इंटरनॅशनल लर्निंग सेंटर, पुणे (SILC) समवेत पॅलेडियम ग्रुप व हिब्रू विद्यापीठ, इस्त्राईल हे सहभागधारक आहेत.

(२) होय.

(३) सदर प्रस्ताव केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता विभागाकडे दिनांक २० मार्च, २०१७ रोजी मान्यतेकरीता पाठविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सापे-तुडील (ता.महाड, जि.रायगड) येथील जमिन खरेदी-विक्री व्यवहारात फसवणूक करण्यात आल्याबाबत

(४८) ८२०२३ (२०-०४-२०१७). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड तालुक्यातील (जि.रायगड) सापे-तुडील येथील जमिन खरेदी-विक्री व्यवहारात ३७ लाख ५८ हजार रूपयांची फसवणूक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित गुन्हेगारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०७-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी फिर्यादीचे तक्रारीवरुन एका आरोपी विरुध्द महाड तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नं. ८३/२०१६ भादंवि कलम ४२०,४६७,४६८,४७१ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. तसेच सदर गुन्हयामधील आरोपीस अटक करण्यात आली आहे. सद्यस्थितीत गुन्हा तपासावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर पोलीस विभागातील कर्मचाऱ्यांने चिटफंड योजना सुरु करुन पोलीस कर्मचाऱ्यांची लाखो रूपयांची केलेली फसवणूक

(४९) ८२०७१ (२०-०४-२०१७). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर पोलीस मुख्यालयात कार्यरत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्याने गत दोन वर्षापासून चीटफंड नावाची योजना सुरू करून बँकेपेक्षा जास्त व्याज देण्याचे आमिष दाखवून पोलीस विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची लाखो रूपयांनी फसवणूक केल्याची माहिती दिनांक १० फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाची तक्रार अनेक पोलीस कर्मचाऱ्यांनी सदर पोलीस ठाण्यात केली असंतानासुध्दा अद्याप चौकशी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्याचा तपशिल काय आहे व त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) सदर प्रकरणी चौकशीत पोलीस मुख्यालय, नागपूर शहर येथील नेमणूकीत असलेल्या एका नाईक पोलीस शिपायाने सदर प्रकरणातील फिर्यादी महिला पोलीस शिपाई व तिच्या इतर साथीदारांना जास्त व्याजाचे आमिष देवून वेळोवेळी फंड म्हणून १,०६,०००/- रुपये इतकी रक्कम स्विकारली व तसेच, इतर साक्षीदारांकडून फंडाची रक्कम म्हणून २,५३,०००/- रुपये अशी रक्कम स्वीकारली व नंतर त्याने जमा केलेली रक्कम परत करण्यास टाळाटाळ केली अशा फिर्यादीच्या तक्रारीवरुन एका आरोपी विरुद्ध पोलीस स्टेशन, सदर, नागपूर शहर येथे

अप.क्र.४७/१७ कलम ४२० भा.दं.वि. वाढीव कलम ४०६, ४०९ भादवि सह कलम ३ एमपीआयडी अक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात आरोपीस अटक करण्यात आली असून आरोपीने एकूण ५६,८६,०००/- रु. ची फसवणूक केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

सदर गुन्ह्यात मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे. प्रकरण न्याप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

भाईंदर (जि.ठाणे) येथे विक्की भांडे नामक मुलाने पोलीसांच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केल्याबाबत

(५०) ८४७६४ (२०-०४-२०१७). ॲड.वारीस पठाण (भायखळा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाईंदर (जि.ठाणे) येथे पोलीस कांस्टेबलच्या विक्की भांडे नामक मुलाने पोलीसांचा त्रास व खोट्या गुन्ह्यात अडकवण्याच्या धमकीस घाबरून भाईंदरच्या जैसलपार्क खाडी/समुद्रात उडी मारून आत्महत्या केल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मयत विक्की आणि त्याचे मित्र भाईंदरच्या जैसलपार्क खाडी किनारी दारू पीत असताना पोलीसांनी त्यांना हटकून खाडी किनाऱ्याच्या चौकीत आणले व पोलीसांनी कंट्रोल रूम ला फोन करून पोलीस व्हॅन मागवली व या प्रकाराला घाबरून मयत व्यक्तीने समुद्रात उडी मारली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनामार्फत सी.आय.डी. मार्फत चौकशी होऊन संबधित दोषींविरुध्द अद्यापपर्यंत कोणती प्रशासकीय व दंडात्मक कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०६-२०१७) : (१) व (२) दि. २६.०१.२०१७ रोजी रात्री मयत व त्याचा मित्र हे त्यांचे स्कुटीचे पेट्रोल संपल्याने ते जेसलपार्क रेल्वे पटरी जवळ थांबले होते. त्यावेळी पेट्रोलींगवर असलेली नवघर पोलीस ठाण्याच्या कर्मचा-यांनी त्यांची विचारपूस केली व गाडीचे कागदपत्र मागितले. त्यानंतर विक्की भांडे यास पोलीस जीप मधून जेसलपार्क पोलीस चौकी येथे नेण्यात आले. तद्नंतर त्याचा मित्र गाडीचे कागदपत्रे घेऊन पोलीस चौकी येथे आला व विक्की हा पोलीस कर्मचारी श्री. अशोक भांडे यांचा मुलगा असल्याचे सांगितले. त्या दोघांची ओळख पटवून त्यांना समज देऊन दोघांना सोडून देण्यात आले. परंतू, विक्की यास तो पोलीस कर्मचा-यांचा मुलगा असून सुद्धा माझी पोलीसांनी विचारपूस केल्याचा राग मनात धरुन दारुच्या नशेत जेसलपार्क येथील खाडीत उडी मारली. जेसलपार्क पोलीस चौकी येथील कर्मचारी यांनी त्यास वाचविण्याचा प्रयत्न केला परंतू खाडीचे पाण्याची ओहोटी वेगाने असल्याने प्रवाहात तो वाहत गेला व मयत झाला.

(३) सदर प्रकरणी राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांनी अ. मृ. ०९/२०१७ या दाखल प्रकरणात मयत यास कोणत्याही गुन्ह्यांत पोलीसांनी तपासासाठी अटक केले नव्हते अथवा चौकशीसाठी ताब्यात घेतले नव्हते त्यामुळे सदर प्रकरण पोलीस कोठडी मृत्यू या प्रकारात येत नाही. त्यामुळे सदर प्रकरणाचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे येत नाही. तसेच सदर प्रकरणाचा तपास स्थानिक पोलीस स्टेशन अधिका-यांमार्फत करावा असे अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार सदर प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे हे करीत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.